**Historicity Research Journal** **Impact Factor : 0.4521 (UIF)**
**ISSN : 2393-8900** **Volume - 2 | Issue - 12 | August - 2016**

# *स्वा.सावरकरांची सामाजिक सुधारणेबद्दलची भुमिका*

*प्रा.मनिषा बंडुराव रोकडे*
*कै.ल.दे.महिला महाविद्यालय, परळी वै.*




***प्रस्तावना***

स्वा.सावरकर एक सामाजिक विचारवंत असण्यापेक्षा कर्ते सुधारक होते. स्वा.सावरकरांनी सुरुवातीपासूनच सुधारणेचा पुरस्कार केलेला आहे. याचे अनेक पुरावे आपणास मिळतात. परंतु हे करत असतांना त्यांना स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्वाचा वाटत होता. 1923 पासुन 1937 पर्यंत स्वा. सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध होते, तेंव्हा रत्नागिरी जिल्ह्याबाहेर जाण्याची तसेच राजकारण करण्याची वा त्या विषयावर बोलण्याचीही याकाळात त्यांना बंदी होती. दुसरा कोणताच उद्योग करणे शक्य नसल्यामुळे त्यांनी या काळात समाजकारण केले असा एक आक्षेप अनेकांनी घेतलेला आहे. रत्नागिरी पूर्व किंवा नंतरच्या काळात त्यांनी समाजकार्य का केले नाही असाही सर्वांना प्रश्न पडतो. परंतु वस्तुस्थितीचा अभ्यास केल्यास काही गोष्टी लक्षात येतात त्याचा आढावा घेणारा हा लेख.

सामाजिक सुधारणेची त्यांना वाटत असलेली आवश्यकता स्वतंत्रपणे समजुन घेतली पाहिजे. रत्नागिरीपूर्व काळात अंदमानातील तेरा वर्षांचा काळ व तत्पुर्वीचा बुद्धीवादी व सामाजिक मते अद्याप तितकी पक्की नसलेला पंचविशीच्या अगोदरचा विद्यार्थी दशेतला काळ समाविष्ट होतो हा काळ पाहिला तर याकाळात त्यांच्याकडून अशा सामाजिक सुधारणेच्या कार्याची अपेक्षा करणे बरोबर दिसणार नाही. रत्नागिरीनंतरच्या कालखंडात संभाव्य फाळणीच्या रुपाने राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न समोर उभा टाकलेला होता. त्यांनी त्यासाठी राजकारणाला महत्व दिल्यास चुकीचे ठरणार नाही. त्याकाळी सारेच भारतीय नेते राजकारणाला महत्व दिलेले आपणास दिसतील. डॉ.आंबेडकर जरी घेतले तरी त्यांनीही निव्वळ समाजसुधारणेच्या कार्यापेक्षा राजकारणाला अधिक महत्व दिलेले आढळते. राजकारणाच्या माध्यमातुन दलितांचे हित साधणे असे त्यांचे धोरण होते. तेंव्हा, राजकारणापासुन सावरकर मुक्त राहु शकत नव्हते व तशी आपण अपेक्षा करणेही चुकीचे आहे. एकदा राजकारण करायचे म्हटले की, माणसे तोडणाऱ्या समाजकारणाला दुय्यम स्थान मिळून ते बाजुला पडणे अपरिहार्य ठरेल. तेंव्हा या जीवनमरणाच्या राजकारणाच्या तुलनेत समाजातील सुधारणेची आवश्यकता न ठरविता ती स्वतंत्रपणे ठरविली पाहिजे. समाजातील सुधारणा ही सातत्याने व संथ गतीने चालणारी प्रक्रिया असल्यामुळे तात्कालिक महत्वाच्या राजकीय प्रश्नापुढे तीला गौणत्व येणे अपरिहार्य ठरते.

राजकारणातुन मुक्त झाल्यावर म्हणजेच स्वातंत्र्योत्तर काळात समाजसुधारणेचा कार्यक्रम हाती घ्यावा अशी स्वा.सावरकरांची योजना होती असे दिसते. त्यावेळेस त्यांचे वय 65 वर्षांचे झालेले होते. प्रकृती वारंवार बिघडत होती. गांधी वधातील आरोपी म्हणून आतोनात मनःकलेश त्यांना सहन करावे लागले. त्यातुन मुक्तता झाल्यावरही नेहरुंच्या सरकारने त्यांना कारागृहात डांबलेच ! या साऱ्या गोष्टींचा त्यांच्या मनावर परिणाम झालेला असणारच तरीही 1949 च्या गांधीवधाच्या खटल्यातून सुटल्यावर ते राहण्यासाठी जेंव्हा बंगलोरला गेले होते. तेंव्हा जाताना त्यांनी समाजसुधारणा या विषयावरची काही लेखांची कात्रणे बरोबर नेली होती व पुढे काढावयाच्या पुस्तकाच्या लिखाणाची जुळणी या वास्तव्यात करण्याचा त्यांचा मनोदय होता असे त्यांच्या चिरंजीवांनी लिहून ठेवले आहे. पण प्रत्यक्षात असे पुस्तक लिहिणे त्यांना जमलेले दिसत नाही. त्यांची शरीरस्थीती मनःस्थिती व परिस्थिती यांच्या आड आली होती. निदान 1954 पर्यंत तरी हीच स्थीती टिकून होती. 1947 ला हरिजन सेवक संघाचे श्री.वि.न.बरवे यांना पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, "वर्तमानपत्रातुन वाचले की कॉंग्रेस, हिंदु महासभाप्रभृती संस्थातील सर्व हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांनी पक्षनिरपेक्ष अशी एक फळी उभारुन अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी कान्हदेशात त्या घातक रुढीवर आणखी एक चढाई करण्याचे कार्य हाती घेतले आहे. इतकेच नव्हे तर जन्मजात म्हणविणाऱ्या परंतु वस्तुतः आज केवळ पोथीजात असलेल्या जातीवादाच्या उच्छेदनार्थ ही आनखी एक संघटीत फळी उभारुन अखिल हिंदुसहभोजनाचाही धूमधडाका कान्हदेशभर उडवून देण्यात सक्रिय आरंभ केलेला आहे. हे आंदोलन अगदी सामायिक नि अभिनंदनीय आहे. जर क्वचित माझी प्रकृती सुधारुन सार्वजनिक कार्यात पडण्याइतकी शक्ती आली तर ह्या अस्पृश्यतेच्या नि पोथीजात जातीभेदाच्या उच्चाटनाचे कार्यच निदान एक–दोन वर्षे तरी करावे आणि त्या घातक रुढीवर आणखी एक अखिल भारतीय चढाई करावी असे वारंवार मनात येते, इतके हे कार्य मला केवळ हिंदुसंघटनाच नव्हे तर मानवी संघटनाचेही निकडीचे वाटते"! या पत्रावरुन हे स्पष्ट दिसते की, त्यांचा हेतु 1947 नंतरचा काळात, प्रकृती साथ देईल तर, प्रत्यक्ष समाजसुधारणा करण्याचा होता. त्यांना अशा सुधारणेची वाटत असलेली

आवश्यकताही वरील पत्रात व्यक्त झालेली आहे. अर्थात प्रकृती व इतर कारणाने त्यांना हे कार्य प्रत्यक्षात करता आलेले नाही.

सामाजिक सुधारणेची आवश्यकता स्वा.सावरकरांना ते अंदमानात जाण्याच्या पुर्वीपासून वाटु लागलेली होती याचे भरपुर पुरावे उपलब्ध आहेत. वयाच्या 19 व्या वर्षी त्यांनी लिहिलेली 'बालविधवा दुःस्थितीकथन' ही कविता यादृष्टिने अभ्यासण्यासारखी आहे. 'समता' पत्रात दिलेल्या खुलाशाच्या उत्तरात स्वा.सावरकर स्वतःच सांगतात की, "जातीभेदाच्या निर्मुलनासाठी वरील मताप्रमाणे मी शाळेत तेंव्हापासुन प्रकटपणे वागत आलो आहे. कॉलेजमध्ये सुद्धा मी हा उघड उपदेश देई. विलायतेत तर बोलावयासच नको. पुढे अंदमानातही हाच उपदेश देई आणि तो प्रत्यक्ष व्यवहारात आणीत मी शेकडो लोकांच्या जाती भेदमुलक दुष्ट समजुती पालटल्या आहेत". ही सुधारणा अंदमानपूर्व काळातील झाली अंदमानातही त्यांनी याच सुधारणेचा पुरस्कार केलेला आहे. याच 'समता' पत्रात ते माझी जन्मठेप मधील पानेच्या पाने अंदमानातील समाजसुधारनेला वाहिल्याचे सांगतात.

### *मिश्र हिंदूमेळा*

स्पृशास्पृश्यांचे स्वतंत्र मेळे, सर्व स्पृशस्पृश्यांचा मिळुन एक मेळा स्पृश्यातील विविध जातीचे वेगळे या सर्व मेळयांची एकमेकात सरमिसळ ही नवी रुढी पडल्यावर सावरकरांनी 1927 साली सर्व हिंदूचा मिळून एक मिश्र हिंदूमेळावा स्थापण्यात आला. या मेळाव्यात स्पृश्यांस्पृश्यासहित सर्वच जण सहभागी असल्यामुळे गणपतीची पूजा आदी सर्वगोष्टी एकत्रच होत. या मिश्रमेळाव्याशिवाय प्रत्येक जातीला आपापली स्वतंत्र मेळावे ठेवण्याचा ही अधिकार होता. कित्येक जण या मिश्रमेळ्यातही असत आणि स्वतंत्र मेळ्यातही असत.

विठ्ठल मंदिरातील गणपतीच्या भेटीस आलेल्या 1927 च्या अशा मिश्रमेळ्यांचा 'श्रद्धानंद' मधील वृत्तांत पाहू, " या मिश्रमेळ्यात विठोबाच्या आवारात अगदी पायरीपुढे मेळ्याची पुढारी मुले उभी होती. त्या मध्ये मंत्र्याचा मुलगा, एका बाजूस उच्चवर्णीय वर्गाचा स्पृश्य मुलगा आता दुसऱ्या बाजुला चांभाराचा मुलगा या तीन मुलांनी सांगितलेल्या पदांचे ध्रुपद धरीत दोन्ही बाजूला मिश्रमेळा उभा असे. एक महारांचा मुलगा दुसरा ब्राम्हणाचा, तिसरा चांभाराचा, चवथा वैश्याचा व पुन्हा महाराचा, पुन्हा मराठ्याचा असे एक अस्पृश्य, एक स्पृश्य अशी पन्नासावार मुले मनोभावाने खांद्याशी खांदा लावून देशभक्तीने रसरसलेली पदे त्या मेळ्यात म्हणत असत. जो तो त्या मेळ्यात घुसण्याचा मान घेऊ पाही." असे हे संमिश्र कार्यक्रम एकीकडे चालु होते व दुसरीकडे व्याख्याने लेख यांद्वारे वैचारीक व सामाजिक प्रबोधन चालु होते.

भंग्याबरोबर सहभोजन करण्याची प्रत्यक्ष सुधारणा त्यांनी अंदमानात चालु केलेली आहे. अस्पृश्यता–निवारणाच्या प्रतिक्षतापत्रावर सही करण्यास टिळकांनी नकार देण्याच्या काळाअगोदर सावरकर ब्राम्हण व भंगी यांचे सहभोजन अंदमानात घडवून आणीत होते. ही गोष्टकोणासही विसरता यायची नाही. अंदमानातुन आपल्या भावाला पाठविलेल्या अनेक पत्रात त्यांनी समाजसुधारणेचा पुरस्कार व उपदेश केलेला आहे.'' जातीभेदाचे शेंडा–बुडख्यासह उच्चाटन झाले पाहिजे." अशी ठाम भुमिका आपल्या पत्रात व्यक्त केलेली आहे. ही समाजसुधारणा करताना एक काळजी घेण्याविषयी सावरकर पत्रात लिहितात की, "आपला इतर राट्राशी आलेला संबंध हा आजचा मुख्य प्रश्न आहे. तो योग्य प्रकाराने वाटेला लागल्या वाचुन कोणतेही आतले प्रश्न समाधानकारक किंवा खरोखर उपयोग होईल, इतपत सोडविणे शक्य नाही तेंव्हा ही समाजसुधारणा करीत असतांना मुख्य स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होईल किंवा तो सोडविण्यात अडथळे किंवा अडचणी येतील अशारितीने अंतर्गत प्रश्नात गढुन जाता कामा नये. '' समाजसुधारणा आणि स्वातंत्र्य आंदोलन यांचा सावरकरांनी सांगितलेला हा सुवर्णमध्यच आहे असे मानले पाहिजे.

### *निष्कर्ष :–*

1) स्वा.सावरकरांनी समाजसुधारणेचा नेहमीच पुरस्कार केलेला आहे.

2) अंदमानपूर्व व रत्नागिरीतील स्थानबद्धतेनंतर त्यांनी समाजसुधारणेला जास्त हात घातला नाही. यासाठी त्याकाळातील परिस्थिती कारणीभूत होती. तरीपण समाजसुधारणेबद्दल त्यांनी विचार मांडले. समाजसुधारणेची आवश्यकता सांगितली.

3) रत्नागिरीत स्थानबद्ध असतांना काही काम नाही म्हणून त्यांनी समाजसुधारणा केली हा आक्षेप वरिल विवेचनावरुन खोटा ठरतो. समाजसुधारणेपेक्षा स्वातंत्र्याचा प्रश्न त्यांना अधिक महत्वाचा वाटत असला तरी गो.ग.आगरकरांना ते आपले गुरु मानतात. ते म्हणतात, ''राजकीय सुधारणा व सामाजीक सुधारणा ही राट्राच्या गाड्याची दोन चाके आहे. यातील कोणतीही सुधारणा मागे ठेवणे योग्य नाही. या दोन चाकांवरभारत देश पुढे न्यायचा आहे. कोणते अगोदर व कोणते मागाहुन असे म्हणणे गैर आहे. कोणतेही चाक मागे राहुन चालणार नाही."

4) समाज सुधारल्याशिवाय स्वातंत्र्याला अर्थ राहणार नाही. स्वातंत्र्य टिकवण्यासाठी समाजसुधारणा झाली पाहिजे असे स्वा.सावरकर म्हणत असत यावरुन स्वा.सावरकरांनी समाजसुधारणेला किती अनन्यसाधारण महत्व दिलेले आहे ते समजते.

### *संदर्भ ग्रंथ सुची*

1) हिंदुहृदय सम्राट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर – '1857 चे स्वातंत्र्य समर' रिया पब्लिकेशन, कोल्हापूर जन आवृत्ती ऑगस्ट 2013

2) हिंदुहृदय सम्राट स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर – 'भारतीय इतिहासाची सहा सोनेरी पाने' रिया पब्लिकेशन, कोल्हापूर जन आवृत्ती ऑगस्ट 2013

3) मोरे शेषराव –सावरकरांच्या समाजक्रांतीचे अंतरंग, राजहंस प्रकाश, पुणे

4) किर धनंजय – स्वातंत्र्यवीर सावरकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

5) प्रा.आर.डी.गायकवाड, प्रा.डॉ.बी.एन.सरदेसाई, प्रा.व्ही.एन.हनमाने– इतिहास लेखनशास्त्र फडके, प्रकाशन कोल्हापूर (चौथी आवृत्ती फेब्रु 1996)

6) स्वामी व्ही.एन.– महाराट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यीक आणि थोर भारतीय विचारवंत विद्या ारती प्रकाशन, लातूर (प्रथम आवृत्ती 2011)